खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### नवीन अभ्यासक्रमांना मान्यता

प्रभात

### राजगुरू महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रमांना मान्यता

**राजगुरूनगर, दि. २१ (प्रतिनिधी)** - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान शाखेंतर्गत एम. एस्सी.-मेडीश्नल केमिस्ट्री, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेंतर्गत एम. कॉम. - बिजनेस डमिनिस्ट्रेशन, बी.बी.ए. व बी.बी.ए. - इंटरनॅशनल बिझनेस तसेच साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन शाखेंतर्गत बी.बी.ए. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेंतर्गत बीएस.स्सी. आय.टी. आणि एम.एस्सी. मायक्रो बायोलॉजी या नवीन विषयांना नुकतीच महाराष्ट्र शासनाने मान्यता दिल्याची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, प्रबंधक के. आर पाचारणे उपस्थित होते.

PuneDistrict, 22 June 2023, Page:003
https://epaper.dainikprabhat.com

सकाळ

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रमांना मान्यता

राजगुरुनगर, ता. २२ : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात काही नवीन अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाने मान्यता दिल्याची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली. यामध्ये व्यवस्थापन व मायक्रोबायोलॉजीचा समावेश आहे.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान शाखेअंतर्गत एम.एस्सी. मेडिसिनल केमिस्ट्री, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेअंतर्गत एम. कॉम. बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बी.बी.ए. व बी.बी.ए. इंटरनॅशनल बिझनेस या अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे.

तसेच साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन शाखेअंतर्गत बी.बी.ए., विज्ञान व तंत्रज्ञान शाखेअंतर्गत बीएस्सी. आय.टी. आणि एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी या नवीन विषयांना नुकतीच महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली असल्याचे पाटील यांनी सांगितले.या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर,प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

बुट्टे पाटील म्हणाले, ''तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संस्थेने रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा विचार केला आहे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात हे नवीन अभ्यासक्रम सुरू होत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे.''

चालू शैक्षणिक वर्षापासून तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या व्यावसायिक शिक्षणाच्या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन टाकळकर यांनी केले.

Pune, District-Today
23/06/2023 Page No. 7

## राजगुरू महाविद्यालयात अभ्यासक्रमांना मान्यता

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान शाखेंतर्गत एम.एस्सी. - मेडीकल केमिस्ट्री, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेंतर्गत एम. कॉम. - बिजनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बी.बी.ए. व बी.बी.ए. - इंटरनॅशनल बिझनेस तसेच साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन शाखेंतर्गत बी.बी.ए. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेंतर्गत बीएस.स्सी. आय.टी. आणि एम.एस्सी. मायक्रो बायोलॉजी या नवीन विषयांना नुकतीच महाराष्ट्र शासनाने मान्यता दिल्याची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर पाचारणे उपस्थित होते. ॲड. बुट्टे पाटील म्हणाले, की तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संस्थेने रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा विचार केला आहे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. तर, संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात नवीन अभ्यासक्रम सुरू झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. चालू शैक्षणिक वर्षापासून तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या व्यावसायिक शिक्षणाच्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले.

My Gramin Edition
Jun 23, 2023 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

# खेडमधील राजगुरू महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रमांना मान्यता

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान शाखेंतर्गत एम.एस्सी. - मेडिकल केमिस्ट्री, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेंतर्गत एम. कॉम. - बिजनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बी.बी.ए. व बी.बी.ए. - इंटरनॅशनल बिझनेस, तसेच साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन शाखेंतर्गत बी.बी.ए. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेंतर्गत बी.एसस्सी. आय.टी. आणि एम.एस्सी. मायक्रो बायोलॉजी या नवीन विषयांना नुकतीच महाराष्ट्र शासनाने मान्यता दिल्याची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर पाचारणे उपस्थित होते. चालू शैक्षणिक वर्षापासून तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या व्यावसायिक शिक्षणाच्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले.

# राजगुरू महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रमांना मान्यता

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान शाखेंतर्गत एम.एस्सी. – मेडीकल केमिस्ट्री, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेंतर्गत एम. कॉम. – बिजनेस डमिनिस्ट्रेशन, बी.बी.ए. व बी.बी.ए. – इंटरनॅशनल बिझनेस तसेच साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन शाखेंतर्गत बी.बी.ए. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेंतर्गत बीएस.स्सी. आय. टी. आणि एम. एस्सी. मायक्रोबायोलॉजी या नवीन विषयांना नुकतीच महाराष्ट्र शासनाने मान्यता दिल्याची माहिती संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली.

या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते. संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सांगितले की, तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी संस्थेने रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा विचार केला असून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात नवीन अभ्यासक्रम सुरु झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. चालू शैक्षणिक वर्षापासून तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या व्यावसायिक शिक्षणाच्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**